# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

## व्दितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – मराठी

समय –2.½ घंटे | वर्ग –7 **(A,C,D,E,F,)** | गुण – 50

---

**प्रश्न 1ला अ  खालील उतारा वाचून त्याखाली कृती कराः**

सायंकाळची वेळ होती. होळीचा सण होता. गावातील काही मुले निंबाच्या झाडाखाली जमली होती. अमृत व इसाब या दोघांची घट्ट मैत्री होती. ते दोघेही तेथे हातात हात घालून आले  व त्यांच्या बरोबर खेळू लागले. शिवून आणलेले नवे कपडे दोघांनी घातले होते. दोघांचे कपडे रंग आकार व कापड सर्व दृष्टीने अगदी सारखे होते. दोघेही एकाच शाळेत, एकाच वर्गात होते. दोघांची घरेही रस्त्याच्या कोपऱ्यावर समोरा समोर होती. थोडक्यात म्हणजे दोघा मुलांची प्रत्येक गोष्ट सारखी होती. फरक फक्त इतकाच होता, की अमृताला आई वडील होते, इसाबला फक्त वडील होते.

दोन्ही मुलं आली रस्त्यावर बसली दोघांनी एकसारखे कपडे घातलेली पाहून एक मुलगा म्हणाला! तुम्ही दोघं किती एकसारखे आहात.

**1) पुढील आकृती पूर्ण करा** (2)

अमृत च इसाब मध्ये सारख्या असणाऱ्या गोष्टी



**2) चौकटी पूर्ण करा.** (2)

1) गावातील मुले इथे जमली

2) सणाचे नाव

3) या दोघाची घट्ट मैत्री होती

**3) विरूद्धार्थी शब्द लिहा.** (1)

1) जुने X

2) सकाळ X

**4) खाली दिलेल्या अ, व, ब. गटातील शब्दांच्या योग्य जोडया जुळवा.** (1)

| अ गट | ब गट |
|---|---|
| नवा कुस्ती | सण, दोरा |
| सुई, होळी | खेळा, शर्ट |

**प्र 2. खालील कविताचे वाचन करून आकृत्या पूर्ण करा.**

लेक तांबड कुंदन, लेक हिरवं गोंदण
लेक झाडाची पावली, लेक हाडांच चंदन
लेक असता मनाची, सारी काळजी मिटते,
लेक असता घरांची रोज समई पेटते.
लेक जागीच थांबते, आणि मनही उदास.

अशी चिमणी बोलकी, साऱ्या घरात हसते,
थोडे रागावले तर, मग रूसून बसते.
सारे जगही रूसले तरी पर्वा करू नये.
पण आपली पाकळी, कधी कधी रूसू नये.
फक्त लेकीला कळते, अरे निर्सगाची भाषा,
काळया रात्रीला लागते. कशी सफाळची आशा.

**प्र 2 अ आकृत्या पूर्ण करा.**

**1)** **कवयित्रीला जाणवलेली लेकीची विविध रूपे** **(2)**

**2)** **लेक घरात असल्याचे कवयित्रीला जाणवणारे फायदे** **(2)**

**3)** **तक्ता भरा. (वचन बदला)** **(1)**

1) झाड –　　　　　2) चिमणी –

**4)** **कवितेतील शेवट समान असणारे शब्द लिहा** **(1)**

**(उदा. कुंदण – गोंदण)**

1) ____ – ____

2) ____ – ____

**प्र 3 रा खालील प्रश्नांची एक – दोन वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(4)**

1) सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते ?
2) रोजनिशी का लिहावी ? रोजनिशी लिहिण्याने काय फायदा होईल असे तुम्हांला वाटते ?
3) लेक घरात नसताना कवयित्रीची अवस्था कशी होती ?

**प्र 3 ब का ते लिहा (कोणतेही दोन)** **(2)**

1) आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला सांगितला –
2) अमृत व इसाब ने शर्टाची अदलाबदल केली –
3) वैष्णवीला गहिवरून आले. –

**प्र 4 अ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(6)**

1) कवयित्रीने लेकीला बोलकी चिमणी का म्हटले आहे ?
2) शब्दांचे महत्व लिहा ?

पंडिता रमाबाईंनी हंटर कमिशनकडे कोणती शिफारस केली ?

**प्र. 4 आ पुढे दिलेल्या चौकटीत म्हणी लपलेल्या आहेत. त्या ओळखा व लिहा.** **(2)**

1)

| | | | |
|---|---|---|---|
| घ | घ | ती | X |
| रो | ली | च्या | X |
| री | मा | X | चु |

2)

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

उत्तर ____________ उत्तर ____________

**प्र. 4 इ. तुमच्या मते खरी मैत्री कशी असावी ? ते लिहा** **(2)**

**किंवा**

**तुम्हाला कशा प्रकारे समाज सेवा करायला आवडेल ते लिहा.**

**प्र 5 अ खालील वाक्यात कंसातील योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहा.** **(2)**

**(अरेरे, अबब, शी, चूप)**

1) ——————! काय दशा झाली त्याची !

2) ———— ! एक अक्षरही बोलू नकोस.

3) ———— ! मला गबाळेपणा अजिबात आवडत नाही.

4) ———— ! केवढा मोठा अजगर!

**प्र 5 आ खालील शब्दातील अचूक शब्द लिहा.** **(1)**

1) गोष्ट, गोश्ट, गोशट, गोष्टट.

2) कप्लना, कल्पना, कलपना, कल्पना.

**प्र 5 इ खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा (कोणतेही 2)** **(2)**

1) किंवा 2) परंतु 3) म्हणून 4) वा

**प्र 5 ई दवाखान्याच्या परिसरात लावण्यासाठी दोन सूचनाफलक तयार करा.** **(2)**

**प्र 6 अ खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा. व योग्य शीर्षक दया.** **(5)**

सकाळची वेळ – बाबांबरोबर फिरायला —— झाडांवर बसलेले पाखरांचे थवे —— किलबिल शुद्ध हवा —— आल्हाददायक वातावरण —— बाबांशी गप्पा मारत घराकडे परतणे —— दिवसभर ताजेतवाने वाटणे.

**प्र 6 ब पत्रलेखन**

**प्र 6 ब** धाकटया भावाला अभ्यासाचे महत्व पटवून देणारे पत्र लिहा **(5)**

**किंवा**

तुम्ही मे महिन्यात सुट्टीत काय करणार हे मैत्रिणीला पत्राने कळवा.

**प्र 6 ब खालील मुद्दयांच्या आधारे कुठल्याही एका विषयावर निबंध लिहा. (5)**

**1) शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन**

(मुद्दे) स्नेहसंमेलन – कधी – पालकही हजर – विविध मुलांचे कार्यक्रम –– नृत्य गायन –– वादन –– अभिनय – नकला – स्नेह संमेलनाची आठवण

**2) मला पंख असते तर ––**

(मुद्दे) पंख का हवेत – पंख मिळाल्यास मनसोक्त विहार – प्रवासातील त्रास नष्ट अपघात नसतील – उंच उंच उडण्याची स्पर्धा जगभर विहार.

**3) प्रजासत्ताक दिन**

(मुद्दे) प्रजासत्ताक म्हणजे काय ? – का साजरा होतो – कशा प्रकारे ? – शाळेत कसा साजरा करतात.

***